MHPU130014642024 **दि. कि. अर्ज. क्र. ५८/२०२४**

**निशाणी १६ खालील आदेश**

(मनिषा भोईटे व इतर वि. कोणीही नाही)

प्रस्तुतचा अर्ज ति-हाईत इसम दशरथ नानासाहेब तावरे यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तुत अर्जात सामील करुन घेण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराच्या कथनानुसार, अर्जदार हा कै. सुमन दशरथ तावरे यांचे पती आहेत. सुमन या दिनांक ०७.०२.२००३ रोजी मौजे कुंभारवळण, ता. पुरंदर, जि. पुणे येथे मृत्यू पावल्या. त्यांची मिळकत संपत्तीवर वारस हक्क मिळवण्यासाठी वरील जाबदार यांनी सदर मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मुळ अर्जदारांनी मृत कै. सुमन हिच्या संपत्तीवर केवळ स्वतःचे हक्क सांगून अर्ज दाखल केला आहे. परंतु प्रस्तुतच्या अर्जात अर्जदाराचे नांव जाणिवपूर्वक मुद्दामपणे वगळले आहे. वास्तविक दावा मिळकत ही प्रस्तुत अर्जदार यांनी दिनांक १८.०८.१९८४ रोजी कै. सुमन तावरे यांच्या नावे खरेदी घेतली आहे व सदर मिळकतीमध्ये प्रस्तुत अर्जदार यांचा ताबा आहे. शेत जमिनीमध्ये त्यांचा शेती व्यवसाय आहे. परंतु मुळ अर्जदार यांनी ही माहिती लपवून वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे. प्रस्तुत अर्जदार हे हिंदु वारसा हक्क कायदा १९५६ नुसार प्रथमश्रेणीतील वारस असून त्यांचा कै. सुमन हिच्या संपत्तीवर हक्क आहे. प्रस्तुत अर्जदार यांचा या प्रकरणामध्ये आर्थीक व कायदेशीर हितसंबंध असल्यामुळे त्यांना अर्जामध्ये समाविष्ट करुन घ्यावे अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जास मुळ अर्जदार यांच्यातर्फे म्हणणे नि. १९ वर दाखल करुन अर्जातील कथन नाकबूल व अमान्य केले. अर्जदाराच्या कथनानुसार कै. सुमन दशरथ तावरे या दशरथ नानासाहेब तावरे यांच्या पहिल्या पत्नी असून पहिली पत्नी हयात असतांना ति-हाईत इसम यांनी दुसरी पत्नी मनिषा दशरथ तावरे हिच्याशी बेकायदेशीर विवाह केलेला आहे. त्यांना दुस-या पत्नीपासून दोन मुले आहेत. ति-हाईत इसम हे मुंबई येथे नोकरीस होते. कै. सुमन दशरथ तावरे यांना पाच मुली व एक मुलगा असे कायदेशीर वारस आहेत. कै. सुमन या ति-हाईत इसम यांनी दुसरा विवाह केल्यापासून ब-याच

वर्षापासून मुलांसमवेत वेगळया राहत होते व स्वतःचा चरितार्थ चालवून त्यांनी मुलांचे विवाह केलेले आहेत. त्यामुळे ति-हाईत इसम यांचा सदर मिळकतीशी कोणताही संबंध नाही. कै. सुमन यांनी त्यांच्या आई-वडिलांकडून पैसे घेवून दिनांक १८.०८.१९९४ रोजी खरेदी घेतली आहे तेव्हापासून सदर मिळकतीमध्ये अर्जदार क्र. १ ते ६ वेगवेगळी पिके घेत आहेत. ति-हाईत इसम यांनी सन १९९० साली मुंबई येथे आंतरजातीय विवाह केला तेव्हापासून ते मुंबई येथे राहत होते. सदर मिळकत ही मुळ अर्जदार यांची कायदेशीर ताबे वहिवाटीची मिळकत आहे. ति-हाईत इसम यांचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**४.** सदरच्या अर्जावर दोन्ही पक्षांनी युक्तिवाद केला.

**५.** प्रस्तुतचा मुळ अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाचे स्वरुप पाहता असे दिसून येते की, कै. सुमन यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल केला आहे. ति–हाईत इसम यांच्या कथनानुसार कै. सुमन यांच्या नावे असलेली मिळकत त्यांनी खरेदी केलेली आहे. याउलट, मुळ अर्जदार यांच्या कथनानुसार सदर मिळकत ही सुमन यांनी त्यांच्या आई–वडिलांच्या कडून पैसे घेवून खरेदी केलेली आहे परंतु सदर बाबत पुरावा आल्याखेरीज अंतिम निष्कर्ष काढता येणार नाही. त्यासाठी ति–हाईत इसम यांना पक्षकार म्हणून समाविष्ट करुन दोन्ही बाजूचा पुरावा विचारात घेणे आवश्यक आहे. ति–हाईत इसम हे कै. सुमन यांचे पती आहेत ही बाब मुळ अर्जदार यांनी मान्य केलेली आहे. याबाबत दोन्ही बाजूचा पुरावा घेणे योग्य व न्याय आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

**१.** अर्ज नि. १६ मंजूर करण्यात येतो.

**२.** अर्जदार यांना अर्जाकामी समाविष्ठ करण्यास परवानगी देण्यात येते.

**३.** मुळ अर्जदार यांनी ति-हाईत इसम यांना अर्जामध्ये समाविष्ट करुन दुरुस्त अर्जाची प्रत पुढील तारखेपर्यत दाखल करावी.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2025.09.26 11:47:53 +0530

सासवड
दि. २४/०९/२०२५

**(सौ. एस. क. देशमुख)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.